<u>अतित्वर्य</u> – कोविड -१९

मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- मा.व्य/6570
दिनांक :- 17/03/2021

## -: कार्यालयीन आदेश :-

<u>विषय</u> :- कोविड केअर (Covid Care Centre) सेंटरकरिता करावयाच्या तयारीबाबत.

पुणे शहरात उद्भवलेल्या कोरोना साथीचा प्रादुर्भाव विचारात घेता पुणे महानगरपालिकेमार्फत सध्या एक ठिकाणी CCC कक्ष सुरु करण्यात आलेले आहे. तथापि, सदर साथीचा वाढता प्रादुर्भाव व वाढती रुग्णसंख्या विचारात घेता पुणे शहरात नव्याने कोविड केअर सेंटर्स सुरु करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने खालील नमूद प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या आस्थापना / इमारती कोविड केअर सेंटरसाठी सर्व सोई सुविधांनी सुसज्ज ठेवणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | शाळा / कॉलेज / मंगल कार्यालयाचे नाव | पत्ता | अंदाजे बेड क्षमता |
|---|---|---|---|
| १. | नंदन अॅक्युरा | बाणेर, पुणे | ३०० |
| २. | बनकर शाळा | हडपसर, पुणे | ३०० |
| ३. | पठारे स्टेडीयम | खराडी, पुणे | ३०० |
| ४. | संत ज्ञानेश्वर होस्टेल | येरवडा, पुणे | ३५० |

तरी, उपरोक्त संस्थांमध्ये कोविड केअर सेंटरसाठी आवश्यक त्या सोई-सुविधा/दुरुस्त्या करून व पूर्वीचे साहित्य प्र. अधीक्षक अभियंता, भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेशी समन्वयाने ताब्यात घेऊन सदर कोविड केअर सेंटर तात्काळ सुसज्ज ठेवण्याची दक्षता संबंधित खातेप्रमुख / विभाग प्रमुख यांनी घ्यावयाची आहे. तसेच सदर ठिकाणी संबंधित महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय यांचा कर्मचारी वर्ग व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात यावा. तसेच महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या सफाई संस्थेमार्फत या कोविड केअर सेंटर मधील दैनंदिन स्वच्छता (दिवसातून २ वेळा) करण्यात यावी. याबाबत कोणतीही त्रृटी राहणार नाही याची संबंधित महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी वैयक्तिक दक्षता घ्यावी. उपरोक्त कोविड केअर सेंटर हे दि. २०/०३/२०२१ पर्यंत कार्यान्वित करण्यात यावे.

(राजेंद्र मुठे)
उप आयुक्त *तथा*
समन्वयक
संस्थात्मक अलगीकरण कोव्हीड-१९
पुणे महानगरपालिका

F:\CORONA\Letter to collector.docx